# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५

**दूरध्वनी क्र. :** (०२२) २२१६ ३९६४ / ६५ / ६९, **फॅक्स क्र. :** (०२२) २२१६ ३९७६

**ई-मेल :** mercindia@merc.gov.in **संकेतस्थळ :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in


**सन २०१६ चे प्रकरण क्र. ४५** **जाहिरात क्र. : २१/२०१५-१६**

# जाहीर नोटीस

## आर्थिक वर्ष २०१६-१७ साठी नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानाकरिता सामान्य (जेनेरिक) वीज दराच्या प्रारुप आदेशावर अभिप्राय मागविण्याबाबत

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा (मविनिआ) आर्थिक वर्ष २०१६-१७ करिता (२०१६ चे प्रकरण क्र. ४५) महाराष्ट्रातील नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानाकरिता सामान्य (जेनेरिक) वीज दराचा प्रारुप आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in या संकेतस्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

२. या प्रारुप आदेशावर, आयोग लेखी अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकती मागवित असून त्या, ६ (१+५) प्रतींमध्ये, **आयोगाचे सचिव यांना, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५** येथे व्यक्तिश: किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा **ई-मेल (फॅक्स क्र. (०२२) २२१६ ३९७६, ई-मेल : mercindia@merc.gov.in)** द्वारा **दि. २८ मार्च, २०१६** पर्यंत कृपया पाठविण्यात याव्यात.

३. या अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकतींवर पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेलचा पत्ता, असल्यास देण्यात यावा. जर कोणत्याही संस्था किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने या अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकती पाठविण्यात येत असतील तर तसे नमूद करण्यात यावे. पाठविणाऱ्या व्यक्तीला आपले म्हणणे व्यक्तिश: मांडावयाचे असेल तर तसेदेखील त्यामध्ये नमूद करावे, म्हणजे अशा प्रकरणी सदर व्यक्तीला, **साऊथ लॉबी, तळ मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५** येथे, **दिनांक २८ मार्च, २०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता** होणाऱ्या जाहीर सुनावणीमध्ये, त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी आयोगाकडून देण्यात येईल. त्यासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

४. दिनांक **२८ मार्च २०१६** रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त होणारे सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती आयोगाकडून आदेशास अंतिम स्वरुप देण्यापूर्वी विचारात घेण्यात येतील.

दिनांक : ०५.०३.२०१६
ठिकाण : मुंबई

स्वाक्षरी/-
**सचिव**, मविनिआ

**SIZE : 12 (W) X 12 (H) = 144 SQ. C. M.; CAPTION KEY NO. RENEWABLE (M) c-2**